सन २०१८-१९ करीता इको टुरिझम (राज्य) (२४०६-२२९५) योजनेंतर्गत संजय गांधी राष्ट्रीय उद्यान, बोरीवली या निसर्ग पर्यटन स्थळाच्या विकास कामांकरिता निधी वितरण करणेबाबत.

महाराष्ट्र शासन
महसूल व वन विभाग
शासन निर्णय क्र. निसप-२०१९/प्र.क्र.१०४/फ-९
मंत्रालय, मुंबई ४०० ०३२
दिनांक :- ०७ मार्च, २०१९

वाचा :-

१. वित्त विभाग, शासन परिपत्रक क्र.अर्थसं-२०१८/प्र.क्र.६९/अर्थ-३, दिनांक २५ जानेवारी, २०१९
२. वित्त विभाग, शासन परिपत्रक क्र.संकीर्ण-२०१९/प्र.क्र.1/२०१९/कोषा प्रशा-५, दि. ३१.०१.२०१९
३. अपर प्रधान मुख्य वनसंरक्षक (अर्थसंकल्प, नियोजन व विकास), महाराष्ट्र राज्य, नागपूर यांचे क्र.कक्ष १/पी/यो/चाबाप्र/प्र.क्र.४२/भाग-१/२१८५/२०१८-१९, दि. २८.०२.२०१९ रोजीचे पत्र.
४. व्यवस्थापकीय संचालक, महाराष्ट्र निसर्ग पर्यटन विकास मंडळ, नागपूर यांचे पत्र क्र.कक्ष-२/यो/ सं.गा.रा.उ./४६३/१८-१९, दिनांक १०.०७.२०१८.
५. अपर प्रधान मुख्य वनसंरक्षक (वन्यजीव) पश्चिम मुंबई यांचे पत्र क्र.कक्ष-२/योजना४४६/१८-१९, दिनांक १६.०५.२०१८ व क्र.१७२८, दिनांक १८.०९.२०१८
६. मुख्य वनसंरक्षक व संचालक संजय गांधी राष्ट्रीय उद्यान बोरीवली यांचे पत्र क्र.कक्ष-३/योजना/११४ /सन २०१८-१९, दिनांक ९.५.२२०१८

प्रस्तावना -:

राज्य योजनेअंतर्गत सन २०१८-१९ करीता निसर्ग पर्यटन/वन पर्यटन स्थळाचा विकास (२४०६-२२९५) या लेखाशिर्षाखाली रू. ८४००.०० लक्ष इतका नियतव्यय मंजूर व अर्थसंकल्पीत आहे. वित्त विभागाच्या दिनांक २५.०१.२०१९ रोजीच्या परिपत्रकान्वये सन २०१८-१९ करिता ८०% च्या मर्यादेत अर्थसंकल्पीय प्रणालीवर निधी वितरीत करण्याकरिता उपलब्ध करुन देण्यात आला आहे.

इको टुरिझम (राज्य) (२४०६-२२९५) योजनेअंतर्गत संजय गांधी राष्ट्रीय उद्यान या निसर्ग पर्यटन स्थळांचा आराखडा दिनांक ०७.११.२२०१५ ला झालेल्या महाराष्ट्र निसर्ग पर्यटन मंडळाच्या तज्ञ समितीच्या सभेत सन २०१५-१६ ते २०१९-२० या पाच वर्षासाठी मंजूर झालेला असून, आराखडयाची एकूण किंमत रु.१९१०५.३६ लक्ष आहे. त्यापैकी सन २०१८-१९ साठी रु.२४१.६० लक्षचा चालू बाब प्रस्ताव व्यवस्थापकीय संचालक, महाराष्ट्र निसर्ग पर्यटन विकास मंडळ, नागपूर यांनी तपासला असता सदर प्रस्तावातील कार्यबाबी मंजूर आराखडयात समाविष्ट आहेत. प्रपत्र ब मध्ये नमूद केलेली कामे करण्याकरिता अहमदाबाद, गुजरात येथील Centre for Environmental Education (CEE) या संस्थेमार्फत NIC व Cats Orientation Centre येथील 3D models/ photo text panels व संजय गांधी राष्ट्रीय उद्यानातील Sianeges system इत्यादी तयार करुन घेण्याबाबत सामंजस्य करार (MOA) करण्यात आलेला असून, ही सर्व कामे त्यांचे मार्फत करण्यात येणार आहे. (CEE) यांनी सदर कामाचे ब्लॉक एस्टीमेट तयार केले असून (MOA) प्रमाणे अनुदानाची मागणी करण्यात येत आहे. त्यामुळे सदर बाबीस तांत्रीक व प्रशासकीय मंजूरीची गरज नसल्याचे प्रपत्र “ब” मध्ये नमूद केले आहे. मुख्य वनसंरक्षक व संचालक, संजय गांधी राष्ट्रीय उद्यान, बोरीवली यांचे संदर्भ क्र.६ अन्वये सदर संस्थेशी रु.४,३९,२६,४००/- चा सामंजस्य करार (MOA) करण्यात आलेला असून ही रक्कम त्यांना ३ हप्त्यात (पहिला हप्ता १० टक्के, दुसरा हप्ता ३५ टक्के व ३ रा हप्ता ५५ टक्के) द्यावयाची होती. त्यानुसार आतापर्यत पहिला व दुसरा हप्ता एकूण ४५ टक्के रक्कम रु.१९७.६७ लक्ष सन २०१७-१८ मध्ये वाटप करणेत आलेली आहे. उर्वरीत तिरा हप्ता ५५ टक्के रु.२४१.६०

लक्षचा चालू बाब प्रस्ताव अपर प्रधान मुख्य वनसंरक्षक (वन्यजीव) पश्चिम मुंबई यांनी संदर्भ क्र.५ अन्वये सादर केला आहे. सदर प्रस्तावास व्यवस्थापकीय संचालक, महाराष्ट्र निसर्ग पर्यटन विकास मंडळ, नागपूर यांनी शिफारस केली असून संदर्भ क्र.३ च्या पत्रान्वये अपर प्रधान मुख्य वनसरंक्षक (अर्थसंकल्प, नियोजन व विकास), महाराष्ट्र राज्य, नागपूर यांनी प्रस्तावास शासन मंजूरी प्रदान करुन BDS द्वारे अनुदान उपलब्ध करुन देण्याबाबत विनंती केली आहे. त्यानुसार या कामासाठी अनुदान वितरीत करण्याची बाब शासनाच्या विचाराधिन होती.

<u>शासन निर्णयः-</u>

अपर प्रधान मुख्य वनसंरक्षक (अर्थसंकल्प, नियोजन व विकास), महाराष्ट्र राज्य, नागपूर यांनी संदर्भ क्र.३ अन्वये शासनास सादर केलेला प्रस्ताव तसेच वित्त विभागाच्या दिनांक २५.०१.२०१९ रोजीच्या परिपत्रकान्वये दिलेल्या सूचना विचारात घेता प्रस्तावातंर्गत मागणी लक्षात घेऊन, अपर प्रधान मुख्य वनसंरक्षक (वन्यजीव) पश्चिम मुंबई यांचे नियंत्रणाखालील संजय गांधी राष्ट्रीय उद्यान, बोरीवली या निसर्ग पर्यटन स्थळाच्या विकास कामासाठी सन २०१८-१९ करीता सोबतच्या प्रपत्र - अ मध्ये नमुद केलेल्या कामाकरिता रु.२४१.६० लक्ष इतका निधी राज्य योजनेअंतर्गत इको टुरिझम (राज्य) (२४०६-२२९५) या लेखाशिर्षा अंतर्गत खालील विहीत केलेल्या अटी व शर्तीस अधिन राहून वितरीत करण्यास मान्यता प्रदान करण्यात येत आहेः-

१. सदर तरतूद खर्च करतांना वित्त विभागाने वेळो वेळी घालून दिलेल्या अटी व शर्तीचे पालन करावे.
२. सदरहू निधी वितरित करण्यापूर्वी प्रस्तावानुसार योजनेतील निश्चित केलेल्या सर्व कामांना सक्षम अधिका-यांची तांत्रिक व प्रशासकीय मंजूरी प्राप्त आहे याची खात्री अपर प्रधान मुख्य वनसंरक्षक (अर्थसंकल्प, नियोजन विकास), म.रा. नागपूर यांनी करुन घ्यावी.
३. वाटप करण्यात येणा-या अनुदानातून खर्च करताना यामध्ये कोणतीही वित्तिय अनियमितता होणार नाही याची दक्षता घ्यावी. तसेच सदरहू कामे करतांना वन (संवर्धन) कायदा १९८०, भारतीय वन अधिनियम, १९२७, वन्यजीव (संरक्षण) अधिनियम १९७२ मधील तरतुदींचा भंग होणार नाही तसेच सर्वोच्च न्यायालय/उच्च न्यायालय/केंद्र शासनाच्या व्याघ्र संवर्धन प्राधिकरण यांनी दिलेल्या मार्गदर्शक सुचना/आदेशाची अवहेलना होणार नाही याची सुध्दा दक्षता घ्यावी.
४. केंद्र शासन व राज्य शासनाचे निसर्ग पर्यटन धोरणाशी अनुकूल राहतील अशीच कामे कार्यान्वित करावी.
५. उपरोक्त कामे मंजूर अनुदानातून उपलब्ध मासिक निधी प्रवाहानुसार खर्च करण्यात यावा. यामध्ये कोणतीही वित्तीय अनियमितता होणार नाही याची दक्षता घेण्यात यावी. तसेच सदरहू विकासाची कामे सन २०१८-१९ या आर्थिक वर्षात पूर्ण करण्यात यावीत. सदरहू रक्कम खर्ची पडल्यानंतर त्याचे उपयोगिता प्रमाणपत्र शासनास सादर करावे.
६. सर्व कामे दर्जेदार होतील याबाबत योग्य शासन कार्यप्रणालीचा वापर केला जाईल व कोणतीही अनियमितता होणार नाही तसेच सर्व कामांच्या गुणवत्तेबाबत वेळोवेळी आवश्यकतेनुसार तपासणी करावी या सर्व बाबींची जबाबदारी अपर प्रधान मुख्य वनसंरक्षक (वन्यजीव) पश्चिम मुंबई यांची राहील.
७. शासन निर्णय दिनांक ०१ डिसेंबर, २०१६ नियम पुस्तिकेत नमुद केल्यानुसार तसेच उद्योग उर्जा व कामगार विभाग, शासन निर्णय दिनांक २४ ऑगस्ट, २०१७ मध्ये नमूद गव्हर्नमेंट ई-मार्केटप्लेस (GeM) पोर्टलची कार्यपध्दती नुसार निविदा प्रक्रियेत ई-निविदा प्रणालीचा वापर करावा.
८. सदर मंजूर कामामध्ये द्विरुक्ती होणार नाही आणि मंजूर कामांव्यतिरिक्त कोणत्याही नवीन बाबीवर /नवीन क्षेत्रावर/ नवीन कामांवर खर्च करण्यात येणार नाही तसेच कामात कुठलीही अनियमितता होणार नाही याची दक्षता घ्यावी.
९. प्रस्तावित कामांमध्ये निसर्गपुरक असलेले साहित्याचा जास्तीत जास्त वापर करावा.

१०. सदर खर्च वित्त विभागाच्या दिनांक २५.०१.२०१९ व दिनांक ३१.०१.२०१९ च्या परिपत्रकातील व त्यासोबतच्या परिशिष्टामध्ये नमूद केलेल्या अटीची पूर्तता होईल, याची दक्षता घेण्यात यावी.

११. शासन परिपत्रक क्र.वनबां-२०१९/प्र.क्र.२४/फ-९, दिनांक ३०.०१.२०१९ अन्वये वनविभागाकडून करण्यात येणाऱ्या कामाकरिता ई-निविदा प्रणालीचा वापर करणेबाबत दिलेल्या निर्देशाचे काटेकोरपणे पालन करण्यात यावे.

१२. सदर मंजूरीस शासन निर्णय क्रमांक एमएससी-२०११/प्र.क्र.१७८/फ-५, दिनांक ३०.९.२०११ च्या परिशिष्टात नमुद केलेल्या अटी व शर्ती बंधनकारक असतील.

उपरोक्त खर्च मागणी क्रमांक सी-७, प्रधान शिर्ष २४०६, वनीकरण व वन्यजीवन, पंचवार्षिक योजनांतर्गत, राज्य योजनांतर्गत योजना, (०२) (०६) इको टुरिझम (राज्य) (२४०६-२२९५) या लेखाशिर्षाखाली सन २०१८-१९ करिता उपलब्ध होणाऱ्या अनुदानातून भागविण्यात यावा.

सदर शासन निर्णय वित्त विभागाच्या दिनांक २५.०१.२०१९ च्या परिपत्रकान्वये तसेच वित्त विभागाच्या शासन निर्णय क्र.विअप्र/२०१३/प्र.क्र.३०/२०१३/विनिमय, भाग-२, दिनांक १७.४.२०१५ अन्वये विभागास प्रदान करण्यात आलेल्या अधिकारास अनुसरुन निर्गमित करण्यात येत आहे.

सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेताक २०१९०३०७१९२००१४८१९ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

Sujay Dodal

Digitally signed by Sujay Dodal
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=Revenue and Forest Department, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=353112ee0fa47f9ff9bedae88f651d09fdb142df5fbce9c004f7eea06d8b9baf, cn=Sujay Dodal
Date: 2019.03.08 12:32:45 +05'30'

(सुजय दोडल)
सह सचिव (वने)
महसूल व वन विभाग

प्रत :-

१. प्रधान मुख्य वनसंरक्षक (वनबल प्रमुख), महाराष्ट्र राज्य, नागपूर
२. अपर प्रधान मुख्य वनसंरक्षक (अर्थसंकल्प,नियोजन व विकास), महाराष्ट्र राज्य, नागपूर
३. अपर प्रधान मुख्य वनसंरक्षक तथा व्यवस्थापकीय संचालक, महाराष्ट्र निसर्ग पर्यटन विकास मंडळ, नागपूर
४. अपर प्रधान मुख्य वनसंरक्षक (वन्यजीव) पश्चिम मुंबई
५. मुख्य वनसंरक्षक व संचालक संजय गांधी राष्ट्रीय उद्यान बोरीवली
६. महालेखापाल-१/२ (लेखा परिक्षा/लेखा व अनुज्ञेयता) महाराष्ट्र राज्य, मुंबई / नागपूर.
७. सार्वजनिक बांधकाम विभाग (इमारत-३), मंत्रालय, मुंबई-३२.
८. वित्त विभाग, व्यय-१० कार्यासन, मंत्रालय, मुंबई-३२.
९. नियोजन विभाग (का-१४७५), मंत्रालय, मुंबई-३२.
१०. कार्यासन अधिकारी, फ-२/ब-१ कार्यासन, महसूल व वन विभाग, मंत्रालय, मुंबई-३२
११. कार्यासन फ-९, महसूल व वन विभाग, मंत्रालय, मुंबई-३२.(निवडनस्ती)

“परिशिष्ट - अ”

शासन निर्णय क्र.निसप-२०१९/प्र.क्र.१०४/फ-९, दिनांक ०७ मार्च,२०१९ सोबतचे परिशिष्ट-अ

सन २०१८-१९ संजय गांधी राष्ट्रीय उद्यान, बोरीवली निसर्ग पर्यटन स्थळ		
अ.क्र.	**बाब निहाय कामे**	**रक्कम रु.लाखात**
१	Development of Nature Interpretation Center	८८.५६
२	Development of CATs Orientation Center	१३८.४६
३	Signage System	१४.५८
	एकूण:-	**२४१.६०**

Sujay Dodal

Digitally signed by Sujay Dodal
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=Revenue and Forest Department, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=353112ee0fa47f9ff9bedae88f651d09fdb142df5fbce9c004f7eea06d8b9baf, cn=Sujay Dodal
Date: 2019.03.08 12:33:40 +05'30'

(सुजय दोडल)
सह सचिव (वने)
महसूल व वन विभाग

****